**इचलकरंजी महानगरपालिका, इचलकरंजी.**

आस्थापना व सामान्य प्रशासन विभाग

**Walk in Interview Notice**

I. इचलकरंजी महानगरपालिकेच्या खालील नमूद विभागाकडील विवक्षित कामकाजासाठी म.न.पा. सेवेतून गट अ / गट ब मधून सेवानिवृत्त झालेल्या व किमान सहायक आयुक्त या पदाचे कामकाजाचा अनुभव असणा-या अधिकारी यांचेकडून खालील पद्धतीचे विवक्षित कामकाजाकरिता करार पद्धतीने सेवा उपलब्धतेकामी इम्पॅनेलमेंटकरिता खाली नमूद अटी/शर्तीस अधीन राहून अर्ज मागविणेत येत आहेत.

(अ) घन कचरा व्यवस्थापन विभागाकडील कामकाज

(ब) निवडणुकीशी संबंधित व अन्य प्रशासकीय कामकाज

II. तसेच खालील नमूद विभागाकडील विवक्षित कामकाजासाठी म.न.पा. सेवेतून सेवानिवृत्त झालेल्या व आपत्ती व्यवस्थापन कामकाजाचा अनुभव असणा-या कर्मचारी यांचेकडून विहित अटी/शर्तीस अधीन राहून अर्ज मागविणेत येत आहेत.

**अटी / शर्ती**

१) Walk in Interview करिता उपस्थित रहाणा-या तसेच मुलाखत प्रक्रीयेअंती निवड करण्यात आलेल्या उमेदवारावर महाराष्ट्र शासन सामान्य प्रशासन विभागाकडील शासन निर्णय क्र. सीबीई १५२५ /प्र.क्र. ३७/आस्थामां (का.१३), दिनांक १० जून, २०२५ (महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध व संगणक संकेतांक २०२५०६१०१२५३३५९१०७) मधील सर्व अटी / शर्ती बंधनकारक राहतील.

२) Walk in Interview करिता उपस्थित रहाणारा सेवानिवृत्त अधिकारी/कर्मचारी शारीरिक/मानसिक व आरोग्याच्या दृष्टीने सक्षम असावा, तसेच प्रस्तावित सेवेसाठी त्याच्याकडे आवश्यक क्षमता व अर्हता असावी.

३) नमूद कामकाजाचा विशेष अनुभव असणा-या उमेदवारास प्राधान्य दिले जाईल.

४) इम्पॅनेलमेंट केल्यानंतर संबंधित विभागाकडे आवश्यकतेनुसार अधिका-यांच्या सेवा उपलब्ध करून घेण्यात येणार असून त्यापेक्षा अधिक उमेदवार पात्र ठरल्यास गुणानुक्रमे निवड करून उर्वरित उमेदवारांचा प्रतिक्षा सूचीमध्ये समावेश केला जाईल.

६) उमेदवाराच्या नियुक्तीसंबंधी तसेच करण्यात आलेली नियुक्ती कोणत्याही वेळी रद्द करण्याबाबत मा.आयुक्त तथा प्रशासक यांचा निर्णय अंतिम राहील.

तरी इच्छुकांनी त्यांचे अर्ज व अर्हता/अनुभव विषयक कागदपत्रांसह (मूळ व छायांकित प्रती) दिनांक ३.१२.२०२५ रोजी सकाळी ११.३० वाजता निम्नस्वाक्षरीत यांचे कार्यालयात उपस्थित रहावे.

इचलकरंजी महानगरपालिका स्थापना २०२२

(सुषमा शिंदे - कोल्हे)

अति.आयुक्त,

इचलकरंजी महानगरपलिका.